## भक्तगाथा...

बलभीमबोवा स्वभावाने फार शांत, सरळ व भोळे होते. कोणी काहीही काम सांगितले तरी त्याचे ते काम मनःपूर्वक करीत. कोणाचेही मन दुखवू नये हे त्यांचे ब्रीद होते. यासुमारास रा.ब.कृ. वासुदेव मुळे या नावाचे गृहस्थ धार येथे ब्रिटीश सरकारकडून सुपरिंटेंडेंट म्हणून नेमलेले होते. यांचे कारकीर्दीस काही लोक नाखूष होते. काही कुचेष्टित लोकांनी मुळेसाहेबांची काहीतरी अवहेलना करावी या हेतूने शिमग्याच्या दिवसांत एका कागदावर मुळे साहेबांस उद्देशून अतिशय पाचकळपणाचा मजकूर लिहिला, तो एका पाकिटात घातला व ते निनावी पाकीट बंद करून बोवांच्या हाती देवून बोवांस सांगितले की, ''हे पाकीट तुम्ही मुळेसाहब यांस त्यांच्या बंगल्यावर नेऊन द्यावे.'' लोकांच्या सांगण्याप्रमाणे बोवांनी ते पाकीट घेतले व मुळेसाहेब यांस देण्याकरीता निघाले. वाटेने ''जय जय रामकृष्ण हरि'' हे भजन म्हणत म्हणत व आपल्या नादात पाऊले टाकीत ते जात होते. बंगल्यावर पोहोचल्यावर मुळेसाहेबांच्या शिपायास 'साहेब कोठे आहे,' असा बोवांनी प्रश्न केला. 'साहेब आता बाहेर येतील, जरा थांबा.' असे उत्तर शिपायाने बोवांस दिल्यावर बोवा थोडा वेळ थांबले. इतक्यात मुळेसाहेब बाहेर आले. त्यास पाहताच बोवांनी हात पुढे करून ते पाकीट त्यास दिले, मुळेसाहेब गर्दीत असल्यामुळे त्यांनी 'तुम्ही कोण, काय' वगैरे प्रश्न न विचारिता ते पाकीट घेतले व ते आपल्या बग्गीत बसून गेले. बोवा परत आपल्या घरी भजन करीत करीत गेले. इकडे मुळे साहेबांनी ते पाकीट गाडीतच फोडून वाचले. पत्रातील चमत्कारीक व अश्लील मजकूर वाचून मुळेसाहेब यांस, पत्र देणाऱ्या इसमाचा फार राग आला व परत घरी आल्यावर ताबडतोब त्यांनी आपल्या शिपायास त्या इसमाचा शोध करण्यास पाठविले. परंतु तो इसम त्यास सापडला नाही.

मुळेसाहेब काशीनाथपंत लेले यांचे स्नेही होते. ते त्यांच्या घरी नेहमी येत असत. वरील प्रकार घडल्यानंतर दुसरे दिवशी रा. मुळे साहेब ते पत्र दाखविण्याकरिता काशीनाथपंतांच्या घरी आले. तेथे पाहतात तो कालचा पत्र देणारा बोवा पुराण सांगत बसलेला आणि लेले यांच्या घरातील मंडळी व आणखी बरेच दुसरे लोक ऐकावयास बसलेले; तो देखावा पाहून काल पत्र दिलेला कुत्सित बोवा तो हाच की, काय, या विषयी त्यांच्या मनात विचार सुरु झाला व ती खात्री करण्याकरीता ते

बोवांच्या अगदी जवळ जाऊन बसले. चेहऱ्याचे निरीक्षण करताच काल पत्र दिलेला बोवा हाच अशी त्यांची खात्री झाली व जगात साधूचे ढोंग करणारे लोक फार असतात, असेही त्यास वाटू लागले व या भोंदू बोवाच्या जाळ्यात काशीनाथपंतांसारखा सुशिक्षित मनुष्य कसा सापडला याचे नवल करीत ते मुकाट्याने पुराण ऐकत बसले. बोवांची पुराण सांगण्याची शैली प्रेमळ व उत्तम त्यास वाटली खरी, परंतु बोवांच्या साधुत्वाबद्दलचा त्यांच्या मनातील संशय दूर झाला नाही. पुराण संपल्यावर मुळे साहेबांनी काशीनाथपंतास बोवांची खरी हकीकत विचारली; काशीनाथपंतावर मुळे यांचा विश्वास असल्यामुळे बोवांची अंतरंगस्थिती व कालच्या पत्राची हकीकत कळल्यावर बोवांविषयी आपल्या मनात आपण विनाकारण गैरसमज करून घेतला याबद्दल त्यास पश्चाताप झाला व त्यांनी बोवाची माफी मागितली. बोवांनी आणून दिलेल्या कालच्या पत्रातील मजकूर बोवांनी लिहिला नसून गावातील कुटाळ मंडळींनी लिहीला असला पाहिजे व भोळ्या माणसाची एक प्रकारे थट्टा केली असली पाहिजे अशी त्यांची खात्री झाली.

■■■

## रूचि रूचि भोजन करो मोरे लाला...✍

जेविता तृप्ती झाली, समाधी लागली।
चुकली जन्मवेळ काया हारपोन गेली ।।धृ।।
सप्रेम ताट मोठे आत वाढिले नेटे।
प्रीति हे शाक गोड। सुख जेविता वाटे।।१।।
वैराग्य भात फार। ज्ञान पोळी घातली।
विज्ञान क्षीर पहा हो । दया शर्करा भली।
भक्ति हे तेल वरी। निष्ठा शोभे गुळ वरी।।२।।
सोज्वळ मुक्ति चारी। कोशिंबिरी निर्धारी।
संतोष आंबवडा। भाव साजिरा मांडा।
निवृत्ती कढी शुद्ध। बोध घृतेशी वाढा।।३।।
स्वानंद थोर पाही। स्वस्वरूपी लाधला।
गुरुकृपे केशव राजी, संसार आचवला।।४।।



## गोजिरवाणी...✍

- सौ. नीता कुलकर्णी

**मुले**- आजी, आता प्रल्हादाची पुढची शिक्षा शस्त्राने वार करण्याची ना?

**आजी**- हो! एकदा एका माणसाने गौतम बुद्धास खूप शिव्या दिल्या, पण ते खूपच शांत होते. तेव्हा त्यांना त्याबद्दल विचारल्यावर ते म्हणाले, ''जर एखादी वस्तू आपणांस कोणी दिली व आपण ती घेतली नाही तर ती देणाऱ्या व्यक्तिकडेच राहते. तसेच त्याने दिलेल्या शिव्या मी घेतल्या नाही तर त्या त्याच्याकडेच राहिल्या.'' बरं का मुलांनो, आपण व्यवहारात असे म्हणतो देखील, ''बोलू देत कोणी बोलले तर! तुझ्या अंगाला भोके पडतात का?''

**मुले**- पण, म्हणजे काय?

**आजी**- अरे, तसेच आहे हे! हे सगळे शाब्दिक वारच नाहीत का? कधी कधी कोणी नजरेनेही वार करतात.

**मुले**- म्हणजेच रागाने पहाणे ना?

**आजी**- हं! तर असे वार आपल्यावर झाले व आपण त्यामुळे गडबडलो नाही, तर प्रल्हाद जिवंतच राहील नाही का?

**मुले** - खरचं की! हं, तर असा आहे याचा अर्थ!

**गोट्या** - आजी, प्रल्हाद म्हणजे काय सांग ना! मी मागची गोष्ट ऐकलीच नाही.

**आजी** - अरे, प्रल्हाद म्हणजे आपल्यातील सात्त्विक वृत्ती! कळले का?

**गोट्या** - हं, समजले!!

**आजी** - आता पुढील शिक्षा होलीकेची ना?

**मुले** - हो, आता होलीका त्यास जाळावयास गेली तर स्वतःच जळून गेली आणि हा मात्र जिवंतच!

**आजी**- हं, तर ही होलीका खरं तर वाईट गोष्टींचा नाश करणारी असते. म्हणजेच उपकारक असते. परंतु प्रल्हादाला संपवायला गेल्यावर स्वतःच नाहिशी झाली. इथे तुम्हास चिंता, काळजी ठाऊक आहे का?

**मुले** - हो आजी! आपण जर आपल्या शरीराची नीट काळजी घेतली तर निरोगी

राहतो किंवा अभ्यासाचीही नीट काळजी घेतली तर चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतो.

**आजी** - बरोबर! म्हणजेच एखाद्या गोष्टीची नीट काळजी घेतली तर ती वाईट गोष्टींचा नाश करते, जसे तुम्ही सांगितल्याप्रमाणे आजारपण, अपयश वगैरे! परंतु हीच काळजी जर वाईट कामासाठी वापरली तर स्वतः नाहिशी होते. जर आपण आपल्या स्वार्थासाठी आपल्या सात्विकवृत्तीचा नाश करण्यास प्रवृत्त झालो व त्याची चिंता करू लागलो तर आपल्या आतील प्रल्हाद हे होऊ न देता उलट आपली स्वार्थी चिंताच नष्ट करतो. म्हणजेच आपल्याला स्वार्थ बुद्धीने वागू देत नाही.

**मुले** - म्हणजे प्रल्हादच जिवंत राहतो असेच ना?

**आजी** - बरोबर! आता पुढील शिक्षा कोणती?

**मुले** - मग, त्याला उकळत्या तेलाच्या कढईत टाकतात. सुरुवातीस त्या कढईत नारळ टाकतात. तेल इतके गरम असते की तो नारळ तडकतो. मग प्रल्हादास त्यात टाकतात, तरीही हा जिवंतच!

**आजी** - सांगा बरं! तेल हे कशाचे प्रतिक आहे?

**मुले** - स्निग्धतेचे!

**आजी** - बरोबर! इथे उकळत्या तेलात टाकणे म्हणजेच आपल्या भावनांचा कोणीतरी गैरफायदा घेणे असाच होय!

**मुले** - म्हणजे?

**आजी** - हे बघा, कधी कधी तुमचे मित्र-मैत्रिणी तुम्हास गोड बोलून फसवितात किंवा कधी कधी तर तुम्हास ते परीक्षेच्या वेळी उत्तरे सांगायला भाग पाडतात आणि होते काय की ती मुले सुटतात आणि तुम्हीच पकडले जाता! बरं तुम्ही त्यांना मदत का करता तर त्यांच्या मैत्रीच्या ओझ्यामुळे!

**मुले** - हो आजी, अशी मदत आम्हाला करावीच लागते. नाहीतर ते आम्हास म्हणतात,''तू मैत्रीचे इमान राखले नाहीस.''

**आजी** - अरे, हेच ते कढईत टाकणे! वरवर जरी गोड बोलत असले तरी ते तुम्हाला संकटातच टाकीत असतात. पण तरीही त्याला फशी न पडणे म्हणजेच प्रल्हाद जिवंत राहणे!

**पान नं. ९ वर**



# शब्द तेचि छेडिता... ✍

**- रघुनंदन**

I, me, myself boring है
us, we interesting है
इंटरनेट है तो फ्रेंडशिप है, फ्रेंडशिप है तो शेअरिंग है
जो मेरा है वो तेरा है, जो तेरा है वो मेरा
जो तेरा है वो मेरा है, जो मेरा है वो तेरा
Hey, उँगलियोंसे मुझे drag कर ले, मजेके हर पल tag कर ले
मेरा नाश्ता तेरा कप प्लेट हो, फिलींग तेरी मेरा अपडेट हो
जोक्स पे मेरे wink भेज दे, जाए तू जहाँ मुझे link भेज दे
जो मेरा...
जेब तेरी मेरा खर्चा हो, blog मेरा तेरा चर्चा हो
मै और तू से हम बने, हमसे बने हम सब
सबसे जुडे तो जिंदगी, hey जिंदगी wassup
तेरा बाईक मेरा हाईक, तेरा post मेरा like
तेरे सूर मेरे गीत, तेरा gossip मेरा tweet
पढूँ हर एक look, तेरा face मेरा book
मेरा सुख तेरा सुख, तेरा दुःख मेरा दुःख
जो मेरा...

आजकालच्या जगात इंटरनेटला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे मोबाईलला पण फार महत्त्व प्राप्त झाले आहे. आताच थोड्या दिवसांपूर्वी एअरटेलची एक जाहिरात फार लोकप्रिय झाली. अर्थातच 'जो मेरा है,....!' या जाहिरातीत मैत्री आणि इंटरनेट यांचे समीकरण बनवले आहे. मोबाईल, इंटरनेट यांचे आजकालच्या तरुणाईंमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. त्याच्याशिवाय यांचे आयुष्य वैराण आहे (असे त्यांना वाटते!). आता या गाण्याचा दुसऱ्या अर्थाने विचार केला, तर वेगळाच अर्थ लागतो. ह्या गाण्याची सुरुवातच अशी आहे,

I, me, myself, boring है, us, we, interesting है,

इंटरनेट है तो फ्रेंडशिप है, फ्रेंडशिप है तो शेअरिंग है

याचा अर्थ असा की गुरुदेव आपल्याला सांगतात की आपण सारखे, 'मी', 'माझे' असे म्हणू नये तर व्यापक व्हायला हवे! आपल्याला 'हे विश्वचि माझे घर' हे माहितीच आहे. या वाक्यात, इंटरनेट म्हणजे गुरुदेवांचाच विस्तार सगळीकडे आहे. आता 'us' आणि 'we' कसे इंटरेस्टिंग आहे? तर आपण जर गुरुदेवांना सगळीकडे बघितले तर आपली सगळ्यांशी मैत्री किंवा शेअरींग सहज होईल.

जो मेरा है वो तेरा...

म्हणजेच आपण जर सगळीकडेच गुरुदेवांना बघितले तर मेरा तेरा असे काहीच उरत नाही व सगळ्यांचेच सगळे होऊन जाते.

उँगलियोंसे मुझे drag कर ले, मजे के हर पल tag कर ले

म्हणजे आपण जर चुकत असलो तर गुरुदेव आपल्याला drag करतात व प्रत्येक वेळेस आनंद देऊन tag करतात म्हणजेच आपली दखल घेतात,

मेरा नाश्ता तेरा कप प्लेट हो, फिलींग तेरी मेरा update हो

जोक्स पे मेरे wink भेज दे, जाए तू जहाँ मुझे link भेज दे

आपण बनवलेल्या नाश्त्याला ते कप प्लेट देतात म्हणजेच आपण केलेल्या कामाला ते आधार देतात, प्रोत्साहन देतात. जसे सुदाम्याचे पुरचुंडीतले पोहेही भगवंताने आवडीने खाल्ले. आपल्या बालीश कृतींना (जोक्स) ते प्रतिसाद देतात. तसेच आपण कुठेही असलो तरी ते आपल्याला जोडलेले (link) असतात.

जेब तेरी मेरा खर्चा हो, blog मेरा तेरा चर्चा हो

मै और तू से हम बने, हमसे बने हम सब

सबसे जुडे तो जिंदगी, hey जिंदगी wassup?

आपण आपलं आयुष्य त्यांचे म्हणून जगलो तर खर्चाची पर्वाच नाही. blog मेरा म्हणजे आपण काही आयुष्यात प्राप्त केले तर ती त्यांचीच जादू असते. मै और तु से... म्हणजे आपण आणि गुरुदेव यांच्यातच सारे जग असते. ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की माझ्यातच सगळ्यांना बघ व सगळ्यांमध्ये मला बघ! सबसे जुडे तो... याचा अर्थ अख्ख्या जीवनात तेच आहेत तर मग जीवनाला आपण न



घाबरता विचारले पाहिजे wassup?

तेरा बाईक मेरा हाईक, तेरा post मेरा like

त्यांच्याच बाईकवर आपण ride घेत असतो, मग पेट्रोलचे कशाला टेंशन? ते आपल्या मनाच्या वॉलवर जे जे post करतात ते आपण like करतो म्हणजेच आपल्याला आवडते.

तेरे सूर मेरे गीत, तेरा gossip मेरा tweet

त्यांच्याच सुरात आपण गीत गात असतो. मग वाद्यांचे टेंशन कशाला? त्यांचे स्मरण आपण नेहमी केले तर (म्हणजेच gossip) मग कुठे काय बोलायची (tweet) चिंताच नाही.

पढ़ूँ हर एक look, तेरा face मेरा book

म्हणजे आपल्या book मध्ये व look मध्ये त्यांच्याच face असेल. मग bookची व look ची फिकीर कशाला?

मेरा सुख तेरा सुख, तेरा दुःख मेरा दुःख

जर आपण असा सगळा विचार केला तर सगळे सुखमयच होईल व दुःख तर काही उरणारच नाही. हे गाणे खरे तर मैत्रीवर आधारीत आहे. पण शेवटी गुरुदेवांनाच जाऊन मिळते. म्हणजे अर्थातच 'जो मेरा है...' अशी परिस्थिती होते नाही का?

■■■

**पान नं. ६ वरून**

**मुले** - हे पण आम्हास आजच कळले.

**आजी** - बरं का मुलांनो, अशाप्रकारे प्रल्हाद जिवंत राहतो आणि हिरण्यकश्यपू म्हणजेच अहंकाराचा शेवटी नाश होतो व आपल्या पृथ्वीवर म्हणजेच आपल्या देहावर, प्रल्हाद म्हणजेच सात्त्विक गुणाला राज्यावर बसवण्यात येते. म्हणजे काय सांगा बरं!

**मुले** - आपल्यातील अहंकार नाश पावला पाहिजे व सात्त्विक गुणातच आपण वागले पाहिजे.

**आजी** - हं! आता कळली ना प्रल्हादाची गोष्ट?

**मुले** - हो आजी, आता मात्र या प्रल्हादाला आम्ही कधीच विसरणार नाही.

■■■

# अहो ऐकलतं का?...✍

- सुनयना

## स्वातंत्र्यदिन

अहो, स्वतंत्र म्हणजे काय? परतंत्र म्हणजे काय? याचा विचार आपण केला आहे का? स्वतंत्र म्हणजे स्वतःच्या तंत्राने वागणे! बळजबरी, जुलूम याचा आयुष्यात स्पर्श नसणे! १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. तो दिवस आपण स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करतो. आज आपल्या आयुष्याला मिळालेला दर्जा हा ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी मिळवून दिला, त्यांची आठवण काढतो. भारत या देशाच्या भौगोलिक रेषेच्या आतमध्ये राहणाऱ्या सर्व नागरिकांना याची पूर्ण जाणीव आहे.

या आपल्या देशावर स्वातंत्र्यपूर्व अनेक वर्षे लढा चालला होता. तसेच आपल्यावर षडरिपुंचे वर्चस्व होते. इंग्रजांप्रमाणेच ते आपल्यावर सत्ता गाजवित होते. परकियांप्रमाणेच त्यांचा पगडा इतका होता की ते या देहरूपी भारतावर जुलूम करीत होते, मनमानी करीत होते. गरीब, सद्वर्तनी जनता जशी होरपळून निघत होती, तसेच ह्या षड्रिपूंच्या वर्चस्वामुळे विवेक, वैराग्य, सत्वगुण यांचा बळी जात होता. जसे इंग्रजांच्या जाचास कंटाळून स्वातंत्र्यवीर, नेते हे देशासाठी धावून आले, त्यांनी त्यांचे प्राणही वेचले, तसेच आपल्यातील अशांती, असमाधान, दुःख या सगळ्यांचा कंटाळा येऊन सद्बुद्धी जागृत झाली. तिने आपल्या देहास गुरुचरणांची शरणागती पत्करायला लावली आणि तो सुदिन आपल्या आयुष्यास प्राप्त झाला. १५ ऑगस्ट एकीएक सद्गुरु व त्यांच्यासमोर पंचभौतिक आपण असा तो १५ आकडा तयार झाला, संवाद सुरु झाला, ऑगस्ट क्रांती आयुष्यात होण्याला! ४७ साल - चार आणि सात म्हणजेच चारी देहांची साथ धरूनच महाराज एक एक देह निरसन करीत होते. इंग्रजांच्या बेड्या तुटल्या व भारतीय जनता आनंदोत्सव साजरा करू लागली. तसेच सर्व इंद्रियगण आनंदोन्मेष झाले. अनेक जन्मींचे ओझे घेऊन ते वावरत होते. त्यांना मुक्तपणे संचार करता येऊ लागला. परकीय राजवट आपल्या जागी परत गेली. सर्व आसुरांचे साम्राज्य देहावरून महाराजांनी दूर केले. स्वरूपाच्या तंत्राने देहाचा व्यापार चालवून दिला. २६ जानेवारी १९५० साली संहिता तयार झाली. देहातील पंचवीस तत्वात स्वतःचे 'मी' पण जोडून २६ सारखा जनावरी (पशु) व्यवहार करू नका, तसेच ५०-म्हणजेच पंचभौतिक देहावर शून्य ठेव हीच संहिता महाराजांनी दिली.

बोधतिथी हा सुद्धा आमच्यासाठी स्वातंत्र्यदिनच आहे नाही का?

■■■



# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार...✍

## सदाचार

सच्चिदानंद परिपूर्ण। या जगद्वृक्षाचे कारण।
अनंत विष्णुते नमन। सदोदितासी।।१।।

**अर्थ** - सत्, चिद् व आनंद असे जे परिपूर्ण आहे तेच हे जगद्वृक्ष होण्याचे कारण आहे. त्या अनंत विष्णुला नमन असो! सदोदिताला (सदा उदित असलेला) नमन असो!

**भावार्थ** - जे मायेच्या साम्राज्यात येते ते असत्, जड व दुःखरूपच ठरते. त्यामुळे ते कधीही परिपूर्ण होऊ शकत नाही. ते देश, काल, वस्तू यांच्या बडग्याखाली सिमीत असते. त्यामुळे त्यास कधीच पूर्णत्व येऊ शकत नाही. पण सच्चिदानंद म्हणजेच ब्रह्म परिपूर्णच असते व तेच मायेचे अधिष्ठान असते. त्यापासूनच माया म्हणजेच हे जग निर्माण झाले आहे. म्हणजे ते हा जगद्वृक्ष निर्माण होण्याचे कारण ठरले आहे. इथे जगद्वृक्ष असे म्हटले आहे. याचे कारण वृक्ष तयार होण्यास जसे एकच बीज कारणीभूत असते, तसेच हे जगद् एकातूनच निर्माण झाले आहे. तसेच वृक्षाचा विस्तार, ऱ्हासही, जगदाच्या विस्तार, ऱ्हासाशी मिळता जुळता आहे. अनंत म्हणजेच ज्यास अंत नाही असा! विष्णु म्हणजेच व्यापक! म्हणजेच चराचरात जो अनंत आहे त्यास नमन केले आहे. आपण कोणतेही कार्य करताना जसे सर्व वडिलधाऱ्यांच्या पाया पडतो तसे! तसेच हे नमन व्यापकास केल्याने साहजिकच ते सदोदितालाही झालेले आहे. सदोदित म्हणजेच जे सदा उदित म्हणजेच उगवलेले असतात. म्हणजेच जे कधीच मावळत नाहीत, ते म्हणजेच सद्गुरु! त्यांनाही हे नमन केलेले आहे. म्हणजेच सद्गुरूंजवळ गेल्यावर या मनाचे **न मन** कधी होते, त्याचा मूळ स्वभाव कधी नाहिसा होतो हे समजतच नाही.

२. सर्व वेदांत गुंफिला ज्यात। कल्याणरूप मलरहित।
जेणे योगिया ज्ञान प्राप्त। सदाचार बोलू ऐसा।।२।।

**पान नं. १३ वर**

# चालविशी हाती धरोनिया

**- माधवी**

अधिक महिना १६ ऑगस्टला सुरु झाला आणि मंदिरात उत्साहाला अधिक उधाण आले. गुरुपौर्णिमा उत्सवापासूनच खरं तर तीन महिन्यांच्या महोत्सवाला सुरुवात झाली होती. नंतर श्रीसस भागिरथीनाथ जयंती उत्सव, श्रीसस माधुरीनाथ वाढदिवस उत्सव, गोकुळाष्टमी उत्सव अशी एकानंतर एक उत्सवांची बरसातच होत होती. प्रत्येक उत्सव काहीना काही नवीन शिकवून जात होता. महाराजांच्या वाणीतून ज्ञानाचे अनेक रंग, छटा बघावयास मिळाल्या. प्रत्येक भक्ताला महाराज भक्तीप्रेम रसात आकंठ बुडवित होते.

गुरुपौर्णिमा उत्सवातून सद्‌गुरुतत्त्वाची, चिदानंदीच्या राजाची अनुभूती घेत घेतच सर्व भक्तगण श्रीसस भागीरथीनाथ जयंती उत्सवात सामील झाले. गुरुमाऊली आपल्या भक्ताला कशी शिकवते, सांभाळते व ब्रह्मत्वाचा अनुभव देते हेच वर्णन गात असताना जाणवते की खरंच गुरुदेवच आपले माता, पिता, मित्र, त्राता, भ्राता सर्व काही आहेत. ह्या अनुभवावर ठाम राहिल्यावर सुरु झाला तो श्रीसस माधुरीनाथ वाढदिवस उत्सव! सगुण सद्‌गुरुचे वर्णन करताना त्याला व्यापक होऊन पहायला महाराजांनी शिकविले आहे. व्यापकत्वावर आरूढ असतानाच अनुभवला तो गोकुळाष्टमी उत्सव! आपल्या आतील हरी आपल्याला कसा खुणावतो, बोलावतो व आपल्याला त्याच्यात रंगवून घेत घेतच वेगळे राहू देत नाही हेच महाराजांनी दाखवले.

यानंतर आला तो अधिक मास! सकाळी अधिकमास पोथीचे वाचन असायचे. त्यानंतर महाराज त्याचे निरूपण करीत असत. वरवर साध्या वाटणाऱ्या कथांमध्ये किती खोल वेदांत दडलेला आहे हे निरूपण ऐकल्यावर समजायचे. कधी कधी तर महाराज भक्तांनाच बोलते करायचे, विचार करायला भाग पाडायचे. आदल्या दिवशीच्या कथेचा गृहपाठ म्हणून अभ्यास करायला सांगायचे. दुसऱ्या दिवशी त्याचे रूपक समजावून घेताना आपण केलेला विचार चूक की बरोबर याचा पडताळा यायचा. अशाप्रकारे पोथी म्हणजे नुसती पुराणातली वांगी न होता सर्व साधकांना खऱ्या अर्थी अभ्यास करायला लावणारे साधन ठरले.

संध्याकाळ मात्र भक्तांच्या कथांनी सजायची! रोज नवनवीन कथेकरी हजर असायचे. अगदी १०-१२ वर्षाच्या मुलांपासून ते ८० वर्षांच्या आजीपर्यंत सर्वांनी कथेच्या गादीवर हजेरी लावली. कधी कधी तर एकामागे एक अशा चार-चार कथाही झाल्या! प्रत्येक मुखातून महाराजांचे वर्णन व अनुभव प्रगट होत होते. महाराज आपल्या शिष्यांना कसे घडवितात याचेच दर्शन होत होते. महाराजांच्या पायाशी वाहिल्या जाणाऱ्या कथेच्या माळेतील एक एक फूल साधक ओवत होता, त्यात वेगवेगळे रंग भरत होता. यामध्ये मेरूमणी शोभावा अशा कथा गुरुदेवांनीही केल्या. शुक्ल पक्षातील पद्मिनी एकादशी व कृष्ण पक्षातील परमा एकादशी या दोन दिवशी महाराजांच्या कथा झाल्या. या टीपेच्या कथा साधकांना खूप काही शिकवून गेल्या. शेवटच्या दिवशी उत्सवाची सांगता दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमाने झाली. अभिषेक, पोथी, महाप्रसाद व संध्याकाळी महाराजांची कथा!

खरचं हा महोत्सव आमची वाटचाल दीर्घ **'मी'** कडे करणारा ठरला नाही का?

■■■

**पान नं. ११ वरून**

**अर्थ -** सर्व वेदांत ज्यात गुंफलेला आहे, जो कल्याणाचे रूप आहे व मलरहित म्हणजेच निर्मळ आहे व ज्याच्यामुळे योगियांना ज्ञान प्राप्त होते तो सदाचार आपण बोलूया!

**भावार्थ -** येथे सदाचाराच्या विवरणाला सुरुवात करण्यापूर्वी त्याचे महत्त्व सांगण्यात आले आहे. या सदाचारामध्ये सर्व वेदांत गुंफलेला आहे. म्हणजेच जो सदाचारी असेल त्यासच तो अवगत होईल. अन्यथा तो आकलन होणार नाही. जसे एखाद्या व्यायामाला सुरुवात करण्यापूर्वी वॉर्म-अप किंवा योगासने करण्यापूर्वी पूरक व्यायाम प्रकार केले जातात, तसाच हा सदाचार आहे. खऱ्या व्यायामाला सुरुवात करण्यापूर्वी शरीराची लवचिकता वाढविली जाते, जेणेकरून व्यायाम सहज व सोपा होऊन केला जाईल व त्याचे पूर्ण फायदे शरीराला मिळतील, कुठलीही इजा किंवा अपघात न होता! तसेच या सदाचाराने वेदांत समजून घेण्यास आपण पूर्णपणे पात्र होतो व तो सहज अंगिकारता येतो. हा वेदांत कसा आहे? तर ज्यायोगे सकळ जीवसृष्टीचे कल्याण होते. तसेच हा वेदांत मलरहित म्हणजेच कशाचाही मळ नसलेला असा निर्मळ आहे आणि म्हणूनच तो कल्याणरूप आहे. यामुळे योगियांना ज्ञान प्राप्त होते. योगी म्हणजे योग साधणारा, स्वरूपाशी जोडून राहणारा! त्याला हे ज्ञान सदाचाराने सहज प्राप्त होते, अंगी बाणवता येते.

(क्रमशः)

# तरुणाई...✍

- आरती ढोरमले

## पाय सगुणाचे धरा, जावे निर्गुणाच्या घरा

गुरूदेव क्या है? कैसे है? क्यों है? यह सब तो पता ही चल जाता है मंदिर में आ आकर, परंतु यह जो पता करने की प्रोसेस होती है ना, बहुत ही मजेदार होती है। गुरुदेव निरूपन करते समय तो बोलते है कि, हमें मंदिर में आकर यह पक्का कर लेना है कि मैं भगवान कैसे हूँ (मी तो स्वये परब्रह्म)! यह शब्दों से नहीं, अनुभव से समझ कर लेना हैं। पर सच में तो हम उस योग्यता के होते ही नहीं है (वो समझने के लिए) और यह भी सिर्फ गुरुदेव को ही पता होता है। फिर पहले वो हमारे अंदर के भगवान नहीं, इंसान (ह्यूमन) को जगाते हैं। हकिकत में तो हम इंसान भी नहीं होते, गुरुदेव ही पहले हमें इंसान बनाते हैं। हमारे कर्तव्य समाज के लिए, समाज तो दूर ही सही पर परिवार के लिए क्या है, वो भी हमें पता नहीं होता। आरती को तो गुरुदेवने कहाँ से कहाँ तक सिखाया है वो बता ही नहीं सकते। खाना बनाने से लेकर ड्रेस-अप होने तक, बिझिनेस (बिझिनेस कैसे करना चाहिए) से पर्सनल लाईफ (लोगो के साथ कैसे रिलेशन रखने चाहिए) तक हर एक चीज गुरुदेव कि ही देन हैं। सच कहूँ ना तो गुरुदेव उस जादूगर जैसे ही करते है, ये देखो गुलाब, गुलाब करते करते हाथ में कबूतर आ जाता हैं। इस तरह वो हमें पहले इंसान बनाते है और फिर, हर एक स्टेप पर लगता है कि, अरेऽऽऽ ये तो गुरुदेव ने ही सिखाया हुआ हैं। ऐसे करते करते एक दिन पता चलता है कि हमारा कुछ नहीं हैं सब गुरुदेव का ही बताया हुआँ हैं। और तब हमारी मन और बुद्धि स्थिर होकर यह समझने लगते है कि गुरुदेव जो बताते हैं वही सच (सत्) है, ठिक उसी तरह जैसे पहली कक्षा में टीचर के एक, बार बताने से ही हम समझ गए थे कि 'A' ऐसा होता हैं, तब हमने बिल्कुल भी शक नहीं लिया था। वरना अब इंग्लिश बोल ही नहीं पाते। वैसे ही जब मन और बुद्धि को पूरा विश्वास आ जाता है, कि गुरुदेव जो बोलेंगे वही १००% सही, तभी हम अद्वैत को आत्मसात करने लगते है, और सही में हमारे, सत्, चित्, आनंद लक्षणों का अनुभव लेते है। पर उस वक्त कुछ समझ नहीं आता कि कैसे गुरुदेव को बताये कि आपने क्या कर दिया। उन्हे सब पता होता है पर, बच्चों को माँ को बताये बिना चैन नहीं मिलता। तब सिर्फ यही कह सकते है,

''तेरे जैसा यार कहाँ, कहाँ ऐसा याराना ऽऽऽ
याद करेगी दुनिया तेरा मेरा अफसाना ऽऽऽ...
मेरी जिंदगी सवारी मुझको गले लगाकर,
बैठा दिया फलक पर मुझे ख्याब से उठाकर
यारा तेरी यारी को मैंने तो खुदा माना ऽऽऽ''

**जेथे जातो तेथे तू और माझा सांगाती, चालविशी हाती धरूनिया।।**

■■■

# गुंजारव...✍

- सौ. शुभांगी मोकाशी

सगुण देवाचे कीर्तन गावे। सगुण देवासी प्रेमे आळवावे।
करुणा भाकावी नम्र व्हावे। भक्तीसी सदा सादर असावे।
परीक्षा द्यावी परीक्षित व्हावे। नामसंकीर्तन नित्य वाढवावे।
हरीकीर्तनी मन हे रमावे। श्रवणी सदा सादर व्हावे।
सर्वेद्रियांचे कान करावे। अमृत पान नित्य प्यावे।
गुरुसेवेलागी शरीर आटवावे। चंदनासारीखे झिजत जावे।
तल्लीन व्हावे मौन साधावे। आत्मस्थितीचे ध्यान असावे।
अनुसंधान अखंड रहावे। कर्पूरासारीखे काही न उरावे।
चढता चढता चढत जावे। दशमद्वारी शांत रहावे।
शुभांगी माधुरी चरण पूजावे। शुभांगी माधुरी रूप व्हावे।
एकादश साधले जावे। मग सर्व सहज स्वभावे।

# संपादकीय...✍

'नेमेचि येतो मग पावसाळा' या म्हणीसारखे दरवर्षीप्रमाणे गुरुपौर्णिमा उत्सवाने उत्सवांची सुरुवात झाली. मात्र यावर्षी अधिक महिना आल्याने अधिकमास उत्सवाचीही यामध्ये भर पडली. अधिक भाद्रपद आल्याने तो गोकुळाष्टमी उत्सवास जोडूनच आला. त्यामुळे साधकांना ती पर्वणीच ठरली. गुरुपौर्णिमा उत्सवाला येऊन दाखल झालेले काही साधक अधिक मासाचा उत्सव संपवूनच घरी गेले. तर काहीजण जाऊन येऊन आनंद लुटत होते. या सर्वाचे वर्णन 'चालविशी हाती धरोनिया' यामधून आलेले आहे.

या अंकापासून 'सदाचार' या ग्रंथाचे निरूपण क्रमशः सुरु करीत आहोत. यातील सुरुवातीचा काही भाग या अंकात आला आहे.

तरुण वर्गातील स्वैराचाराचे वेड सध्या सर्वत्रच गाजत आहे. याच पार्श्वभूमीवर 'अहो ऐकलतं का?' मधील 'स्वातंत्र्यदिन' स्वातंत्र्याची वेगळीच व्याख्या तरुणांना पोहोचवेल अशी आशा आहे. तसेच मैत्रीचे बेसुमार वेड या पिढीत वाढत आहे. या मैत्रीचा वेगळाच पैलू 'शब्द तेचि छेडिता' वाचताना पहायला मिळेल.

मैत्रीचे आणखीही पडसाद 'तरुणाई' त उमटलेले आहेत. साधकाला हाती धरून माऊली कसे बदल घडविते याचे सुरेख वर्णन आले आहे.

नेहमीप्रमाणे 'भक्तगाथा' व 'गुंजारव' हेही वाचनीय आहेत. जसा पावसाळा प्रत्येक वर्षी नवनवीन पिके देऊन जातो, तसा 'पाझर' चा अंकही प्रत्येक वेळी नवनवीन विचार वाचकांना देवो व गुरुदेवांनी लावलेल्या चैतन्य रोपट्याला खत-पाणी देवो हीच सद्गुरुचरणी प्रार्थना!

आईवडिलांनी देहाचे नाव धरायला लावून अज्ञानी केले. देहभाव धरल्यामुळे देहच मी वाटू लागला. अज्ञान नसते तर ज्ञान घ्यायला येतोच कोण? सद्गुरु 'आत्मज्ञान' देऊन देवच करतात. देवाची ओळख करून देतात म्हणून ते देवांचेही देव आहेत.

**- श्रीसस भागीरथीनाथ**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

पाझर अमृताचा

To,

BOOK-POST

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. २० जाने. ते २९ जाने. २०१३

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. ०८मार्च ते १० मार्च २०१३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. २३ मार्च ते १एप्रिल २०१३

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. २१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१२

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |

**।। श्री सद्गुरु प्रसन्न ।।**

अमृतं भोजनम् ।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष ९ वे ❖अंक ३ रा ❖ निज भाद्रपद -आश्विन-कार्तिक शके १९३४ ❖ १७ सप्टें. २०१२ ते १३ डिसें. २०१२

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**

## अंतरंग

◆ भक्तगाथा ०३
◆ रुचि रुचि भोजन ०४
◆ गोजिरवाणी ०५
- सौ. नीता कुलकर्णी
◆ शब्द तेचि छेडिता ०७
- रघुनंदन
◆ अहो ऐकलतं का? १०
- सुनयना
◆ भागिरथीच्या काठावर... ११
◆ चालविशी हाती धरोनिया १२
- माधवी
◆ तरुणाई १४
- आरती ढोरमले
◆ गुंजारव १५
- सौ. शुभांगी मोकाशी